Roll No.
रोल नं.

Series SHC

Code No. **9**
कोड नं.

- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में मुद्रित पृष्ठ 4 हैं ।
- प्रश्न-पत्र में दाहिने हाथ की ओर दिए गए कोड नम्बर को छात्र उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर लिखें ।
- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में 8 प्रश्न हैं ।
- कृपया प्रश्न का उत्तर लिखना शुरू करने से पहले, प्रश्न का क्रमांक अवश्य लिखें ।

MARATHI

मराठी

Time allowed : 3 hours *Maximum Marks : 100*
निर्धारित समय : 3 घण्टे *अधिकतम अंक : 100*

SECTION A

1. पुढील वाक्ये कंसांत दिलेल्या सूचनांप्रमाणे बदलून पुन्हा लिहा : (कोणतीही पाच) 15

(i) मी आता पत्र लिहीत आहे. (अनेक वचन करा.)

(ii) अनुपम आला नाही. (योग्य क्रियाविशेषण जोडा.)

(iii) आज थंडी पडली आहे. तिने स्वेटर घातला. स्वेटर लाल आहे. (तिन्ही वाक्ये जोडून एकच वाक्य करा.)

(iv) दारापुढे रांगोळी घाल. (नकारार्थी वाक्य करा.)

(v) हे पुस्तक सुरेश आणला. (वाक्यातील चूक दुरुस्त करा.)

(vi) दीपा, तांदूळ निवड, भात लाव आणि पोळ्या कर. (आज्ञार्थाऐवजी भूतकाळ करा.)

(vii) चौथा मुलगा इतरांपेक्षा उंच आहे. (क्रमवाचक विशेषणाऐवजी संख्यावाचक विशेषण वापरा.)

2. (i) विशेषण बनवा :— खाली, इथे, गोडी 3

(ii) अनेक वचन करा :— पणती, दिवा 2

3. कंसांतील शब्दांची योग्य रूपे वापरून वाक्ये पूर्ण करा. (कोणतीही पाच) 5

(i) सुरेश, _____ वर चित्र काढ. (फळा)

(ii) सचिनने दोन्ही डावांत शतक _____ . (काढणे)

(iii) रस्त्यावरून वाहने वेगात _____ . (जाणे)

(iv) ही पेन्सिल _____ आहे का ? (तू)

(v) आमच्या गावी रविवारी _____ बाजार भरतो. (आठवडा)

(vi) तिला मंजिरीला फोन _____ होता. (करणे)

(vii) या जंगलात अस्वले _____ . (असणे)

SECTION B

4. पुढील उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा : 10

महान पुस्तकाची कसोटी म्हणजे आपल्याला ते पुस्तक एकदाच वाचावेसे वाटते, की एकाहून अधिक वेळा. कोणतेही खरे महान पुस्तक पहिल्यांदा आपल्याला जितके वाचावेसे वाटते, त्यापेक्षाही जास्त तीव्रतेने दुसऱ्यांदा वाचावेसे वाटंते; आणि त्यानंतर जितक्या वेळा आपण ते वाचू, त्या प्रत्येक वेळी त्यात आपणाला नवे अर्थ आणि नवी सौंदर्ये गवसतात. एखाद्या सुशिक्षित आणि सदभिरुचिसंपन्न माणसाला जे पुस्तक एकदा वाचल्यावर पुन्हा वाचावेसे वाटत नाही, त्या पुस्तकात फारसे काही नसते. तथापि एकाच व्यक्तीचा निर्णय आपण अचूक मानू शकत नाही. एखाद्या पुस्तकाला महान बनविणारे लोकमत हे अनेकांचे मत असले पाहिजे कारण अगदी सर्वात थोर टीकाकारांमध्ये देखील काही प्रकारची निष्क्रियता, काही प्रमाणातले अनौचित्य असू शकते. अनेक पुस्तकांच्याविषयी विश्वासार्ह मूल्यमापन करणारा माणूस विविध पैलूंचा असला पाहिजे. काही वेळा एका टीकाकाराचा निर्णय आपल्याला शंकास्पद वाटू शकेल. परंतु पिढ्यानुपिढ्यांच्या निर्णयाच्या ठायी शंका संभवतच नाही. शेकडो वर्षे ज्या पुस्तकाचे गुणगान व कोडकौतुक होत आलेले आहे, अशा एखाद्या पुस्तकामध्ये एकदम आपल्याला काही चांगले आढळणार देखील नाही कदाचित, पण तरी हे निश्चित आहे की ते पुस्तक प्रयत्नपूर्वक अभ्यासल्यानंतर या गुणगानाचे आणि कोडकौतुकाचे कारण आपल्याला समजून घेता येईल. एखाद्या गरीब माणसाकरिता सर्वोत्कृष्ट ग्रंथालय तेच असेल, की जे संपूर्णतया अशा तऱ्हेच्या, काळाच्या कसोटीवर उतरलेल्या ग्रंथांनी भरलेले असेल.

(i) खऱ्या महान पुस्तकाचे गमक कोणते ?

(ii) अशा पुस्तकाचे पुनःपुन्हा वाचन करताना कोणता अनुभव येतो ?

(iii) एखाद्या पुस्तकाचा दर्जा ठरविताना काय करणे आवश्यक आहे ?

(iv) एका टीकाकाराचे मत आणि पिढ्यानुपिढ्यांचे मत यांमध्ये कोणता फरक आहे ?

(v) सर्वोत्कृष्ट ग्रंथालय कोणते ?

SECTION C

5. पुढीलपैकी ***एका*** विषयावर निबंध लिहा : 15

(i) हिवाळ्याची चाहूल

(ii) चांगल्या वागणुकीच्या सवयी

(iii) वाढती लोकसंख्या

SECTION D

6. (अ) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : 10

(i) "विश्वकर्त्याने निर्माण केलेल्या प्राणिमात्रांस जे कोणी कोणत्याप्रकारचा निरर्थक त्रास देत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत."

(ii) "देवाने ही माणसांची एक निराळीच घडण केलेली आहे. त्यांच्यात रत्नागिरीच्या लाल चिऱ्याचे, नारळ-फणसाचे, खाजऱ्या आळवाचे आणि फट म्हणताच प्राण कंठाशी आणणाऱ्या ओल्या सुपारीचे गुण अगदी एकवटून आहेत."

(iii) "आश्चर्य वाटलं. त्याला अक्षरज्ञान कुठं होतं ? मग तो वाचतो कसा ?"

(ब) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे द्या : 10

(i) डॉ. राधाकृष्णन यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणते पैलू कुकंदकरांनी वर्णन केले आहेत ?

(ii) 'कशासाठी जगतो आहोत आम्ही !' या प्रसंगातून अप्पांच्या स्वभावाचे कोणते दर्शन घडते ?

(iii) 'श्रीशिवछत्रपतींचे कार्य' या पाठात शिवाजी महाराजांच्यां कार्यपद्धतीचे वर्णन कसे केले आहे ?

7. (अ) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : 10

(i) "दुग्धपूर नसतां निजरूपीं क्षीरसिंधु जैसा ।
वसंत आला नाहीं तरि उद्यानभाग जैसा ।।
अमृतकराचा उदय न होतां रजनिसमय जैसा ।
तुमच्या विरहीं आज जाहला कवण देश तैसा ।।"

(ii) "काठोकाठ भरू द्या पेला, फेस भराभर उसळू द्या !
प्राशन करिता रंग जगाचे क्षणोक्षणी ते बदळू द्या !"

(iii) "आपणच आपल्याला लिहिलेली
पत्रं वाचता वाचता
ओले होणारे डोळे पुसून
फडफडू द्यावीत वाऱ्यावर पानं"

(iv) "तळियाचे पाळीं वृक्षावरी बैसुनी ।
कैसा चातक बोभाइतो रे ।
ताहाना फुटे परी उदक नेघे ।
मेघाची वाट पाही रे ।।"

(ब) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांतील अलंकार ओळखा : 5

(i) "त्वत्स्थंडिली ढकलिले प्रिय मित्रसंघा
केले स्वये दहन यौवन-देह-भोगा"

(ii) "गळण्याआधी सळसळुनी ही रंग उधळिती पाने
आग लागल्यागत राळांचा फाग खेळती राने"

(iii) "होत्या लाटा उधळित अपुली फेनिल कविता"

8. (अ) 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकात शिवाजी महाराजांचे व्यक्तिचित्रण कसे केले आहे, ते स्पष्ट करा. 10

किंवा

'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकातील नाट्यमयतेचा विकास कसा होत जातो, ते स्पष्ट करा.

(ब) पुढीलपैकी ***एका*** प्रश्नाचे संक्षिप्त उत्तर लिहा : 5

(i) शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी राजांची मनः स्थिती कशी झाली ?

(ii) हंबीररावांच्या व्यक्तिमत्त्वातील कोणती वैशिष्ट्ये 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकात दिसून येतात ?